# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १८.०२.२०२५**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१२.०२.२०२५ ते १८.०२.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१९.०२.२०२५ ते २३.०२.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | दिनांक | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३६ | ३७ | ३५ | ३४ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १६ | १५ | १५ | १४ | १५ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ६६ | ६१ | ५८ | ५५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २५ | २४ | २५ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ७ | ६ | ७ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | उ.ई. | उ.ई. | उ.ई. | उ.ई. | उ.ई. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये पुढील २ दिवस कमाल तापमान ३६.० ते ३७.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तर त्यानंतर पुढील ३ दिवस कमाल तापमान ३३.० ते ३५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान १४.० ते १६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५५ ते ६९ % या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता २४ ते २५ % या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते ०७ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी ते सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सामान्यत: सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी ते सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ कमाल तापमानमध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी<br>➢ उसामध्ये खोड किडीच्या नियंत्रणासाठी उसाच्या शेतात प्रती हेक्टरी ५ कामगंध सापळे (ई.एस.बी.ल्युर) शेतात लावावे.<br>➢ ऊस रोपे पुर्नलागवड करण्यासाठी **ट्रॅक्टरचलित फुले ऊस रोपे पुर्नलागवड यंत्राचा** वापर करावा. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने रोपे पुर्नलागवड केलेल्या **खर्चात ६० ते ७०% बचत** होते व **वेळेमध्ये** पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत **७० ते ८०% बचत होते.** |
| संदेश | | फेब्रुवारीमध्ये ऊस पिकास दररोज ३.२७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच )४ लिटरचा ड्रीपर (दररोज ४९ मिनिटे चालवावा. |
| गहू | पक्वता | ➢ लवकर पेरणी केलेल्या गहू कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे.पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत.<br>➢ कणसे उन्हात वाळवून झाल्यानंतर मळणी करावी व साठवनुकीपूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| ऊस | वाढीची | ➢ खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊसाच्या शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी व ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) शेतात लावावे. आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ किलो प्रति हेक्टरी याप्रमाणात सरीमध्ये चळीतून द्यावे.<br>➢ बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली ऊसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१५२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) हि खतमात्रा देऊन बांधणी करावी. को.८६०३२ ऊसासाठी २५% रासायनिक खतमात्रा वाढवून द्यावी. |
| द्राक्ष | मणी विकसित होणे | **पाणी व्यवस्थापन**<br>➢ जर माती वाफसा स्थितीत असेल, तर द्राक्षबागेला पाणी देणे टाळावे<br>➢ बांधावरील आर्द्रता टिकवण्यासाठी आच्छादन (मल्चिंग) करा. यामुळे बांधाच्या पृष्ठभागावरील ओलाव्याच्या बाष्पीभवनामुळे मुळांच्या परिसरात क्षारता साचण्याचे प्रमाण कमी होईल.<br>➢ मन्यांच्या वाढीपासून ते काढणीच्या टप्प्यापर्यंत, सर्व द्राक्ष उत्पादन करणाऱ्या प्रदेशांमध्ये ठिबक सिंचनाद्वारे ६८०० ते १०२०० लिटर प्रति एकर प्रति दिवस पाणी द्यावे<br>**रोग व्यवस्थापन**<br>➢ काही भागांमध्ये भुरी (पावडरी मिल्ड्यू) रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. संध्याकाळी उशिरा सल्फर ८० डब्ल्यू. डि.जी. @ २ ते ३ ग्रॅम प्रति लिटर फवारणी करावी. भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी अँपेलोमायसिस क्विस्क्वालिस चा अधिक वापर करावा. तसेच, बॅसिलस सबटिलिस @ २ मिली प्रति लिटर फवारणी करावी. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


| | | |
|---|---|---|
| डाळिंब | विश्रांतीचा काळ | जर विश्रांतीच्या कालावधीत फळबागांची योग्य निगा राखली नाही, तर किडी व रोगांचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे स्टेम बोरर, शॉट होल बोरर, वाळवी, माइट्स, पाने खाणाऱ्या अळी आणि रसशोषक किडी (मिली बग, खवले किड) यांसारख्या किडींचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे. आढळलेल्या किडींनुसार, १५ ते २० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या घ्याव्यात. पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात:<br>अ) जर पानांवरील कीड नियंत्रणात असेल, तर केवळ ॲझाडिरॅक्टिन /नीम तेल @ ३ मि.ली./लिटर पाणी याची फवारणी करावी.<br>ब) जर पानांवरील कीड प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असेल, तर खालीलपैकी कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करावी:<br>• लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% *ई.सी.* @ ०.५ ते ०.७५ मि.ली./लिटर पाणी<br>• इंडोक्साकार्ब *१४.५ 5% एस.सी.* @ ०.७५ मि.ली./लिटर पाणी<br>• सायनट्रानिलीप्रोल *१०.२६ % ओ.डी.* @ ०.७५ मि.ली./लिटर पाणी<br>• थायामेथॉक्साम *२५% डब्ल्यू. जी.* @ ०.५ ग्रॅम/लिटर पाणी<br>क) फळ तोडणीनंतर खोडाला १०% बोर्डो पेस्ट लावावी. मुख्य खोडास जमिनीपासून २-३ फूट उंचीपर्यंत व्यवस्थित लेप द्यावा. |
| मिरची | फुलोरा | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्याने काही ठिकाणी कोळी किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फेनप्रोपॅथ्रीन ३०% ईसी ५ मिली किंवा फेनॅक्झाक्विन १० ई.सी. २५ मिली प्रती १० लीटर पाण्यातून फवारणी करावी. |
| भेंडी | फळे विकसित होणे | ➢ काही ठिकाणी भेंडी पिकावर फळे पोखरणाऱ्या आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी किड लागलेली फळे मातीत पुरावीत. पिकावर डेल्टामेथ्रिन २.८% ई.सी. १० मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ई.सी ६ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारणी करावी.<br>➢ ट्रायकोकार्ड १० प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. |
| आंबा | फळ धारणा | ➢ कोरडे हवामान आणि तापमानात होणारी वाढीमुळे झाडाला ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असते. आंबा फळांची फळगळ कमी करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसातून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे वाटाणा आकारापासून ते सुपारी आकाराची होईपर्यंत द्यावे.<br>➢ बागेमध्ये जमितीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा |
| पशुधन | वाढीची | उन्हाळयामध्ये जनावरांचे आरोग्य आणि उत्पादकता व्यवस्थित ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी<br>**१. पुरेशी सावली:**<br>➢ जनावरांना थेट सूर्यप्रकाशापासून (उन्हापासून) बचावासाठी त्यांना सावलीमध्ये ठेवावे. सावलीसाठी योग्य हवेशीर असलेली शेड तयार केली जाऊ शकते.<br>➢ उष्णतेचा ताण टाळण्यासाठी हवा चांगली खेळती राहील याची काळजी घ्यावी, ज्यामुळे दुधाच्या जनावरांमध्ये दूध उत्पादन आणि एकूण उत्पादकता व्यवस्थित राहू शकते.<br>**२. पाणी उपलब्धता:**<br>➢ स्वच्छ, थंड पाण्याचा सतत पुरवठा उपलब्ध करावा. उन्हाळयात जनावरांच्या शरीरातील पाणी कमी होण्याचा धोका मोठा असतो, त्यामुळे प्राण्यांना नेहमीच पाणी उपलब्ध करावे.<br>➢ पाण्याच्या टाक्यांची नियमितपणे स्वच्छता करा आणि त्यांची निगा ठेवा जेणेकरून पाणीदूषित होणार नाही.<br>**३. कुकुटपालनासाठी थंड करण्याची व्यवस्था आणि वेंटिलेशन:**<br>➢ शक्य असल्यास पंखे किंवा मिस्ट करणारी प्रणाली वापरा.<br>➢ कुकुटपालन शेडमध्ये थंडता राखण्यासाठी कुलर्स किंवा पंखे ठेवावीत<br>**४. आहारात बदल:**<br>➢ उष्णतेच्या काळात, जनावरे आपला आहार कमी घेऊ शकतात. जनावरांना सहज पचणारा, पौष्टिक आहार द्यावा जेणेकरून त्यांची ऊर्जा टिकून राहील.<br>➢ शक्यतो प्राण्यांना सर्वाधिक उष्णतेच्या काळात (दुपारी) आहार देण्याचे टाळावे आणि सकाळी किंवा संध्याकाळी त्यांना आहार द्या.<br>**५. सॉल्ट लिक्स आणि खनिज:**<br>➢ प्राण्यांना खनिज ब्लॉक्स किंवा सॉल्ट लिक्स उपलब्ध करा, जेणेकरून ते आवश्यक खनिज मिळवू शकतील, जे उष्णतेमुळे आणि वाढीव पाण्याच्या वापरामुळे कमी होऊ शकतात.<br>**६. नियमित आरोग्य तपासणी:**<br>➢ उष्णतेच्या कारणाने जनावरे रोग, परजीवी आणि इन्फेक्शनसाठी अधिक संवेदनशील होऊ शकतात. नियमितपणे उष्णतेचा ताण, निर्जलीकरण आणि कोणत्याही त्वचा रोगांची तज्ञ पशुवैद्यकच्या सहाय्याने तपासणी करा.<br>➢ पाळीव प्राण्यांमध्ये जंतनिर्मूलन करावे आणि उन्हाळयात जास्त प्रादुर्भाव होणाऱ्या बाह्य परजीवी जसे गोचीड, पिसवा किंवा माशांचा बंदोबस्त करावा<br>**७. गवत चराई व्यवस्थापन:**<br>➢ दुपारच्या वेळी उष्णतेच्या काळात जनावरे चारावयास नेणे टाळावे आणि प्राण्यांना गवत चरायच्या वेळी सावली आणि पाणी द्यावे.<br>➢ शक्य असल्यास, उष्णतेपासून वाचण्यासाठी संध्याकाळी किंवा सकाळी जनावरे चारावयास न्यावीत. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १८.०२.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**